## नियमीत दिवाणी दावा क्र. १९७/२०१० मध्ये निशाणी १९७ वरील आदेश

०१. प्रतिवादींनी सदचा अर्ज हा गंगाबाई ही प्रतिवादी क्र.१ ची कायदेशीर विवाहीत पत्नी आहे काय व वादी हा प्रतिवादी क्र.१ चा कायदेशीर मुलगा आहे काय असे अतिरीक्त मुद्दे काढण्यासाठी दाखल केला आहे. सदर अर्जावर वादींनी त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. वादींच्या कथनाप्रमाणे प्रस्तुत प्रकरण हे उभय पक्षांचा पुरावा होऊन अंतिम युक्तिवादासाठी असताना प्रतिवादींनी सदरचा अर्ज दिलेला आहे. सदरचा अर्ज हा दावा प्रलंबीत ठेवण्यासाठी दाखल केला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज हा खर्चासह फेटाळण्याची विनंती केली.

०२. अर्ज, म्हणणे, पटलावरील इतर दस्त यांचे अवलोकन केले. प्रतिवादी यांनी त्यांचा लेखी युक्तिवाद पटलावर दाखल केला आहे. तसेच प्रतिवादींनी १. Sri. Nanjundachari V. The Chairman KEB Cauvery Bhavan Bengalore & another 1999 (1) CCC 265 Karnatak. 2) Lekhraj Dideli V. Sardar Sarvan Singh A.I.R. 1971 M.P. 172. 3) Snow White Food Prducts Vs. Sohanlal A.I.R. 1964 Cal. 209, या न्यायनिवाडयांचा आधार घेतला. मा. उच्च न्यायालयाने वरील न्यायनिवाडयामध्ये नोंदविलेले निष्कर्ष विचारात घेऊन सदरचा अर्ज निकाली काढत आहे. वादी यांच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांचा अर्ज व दाखल केलेले म्हणणे प्रमाणे युक्तीवाद केला.

०३. वादिने सदरचा दावा हा वाटणी होऊन निरंतर मनाईहुकूम मिळण्यासाठी दाखल केला आहे. वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.१ हे त्याचे वडील असून प्रतिवादी क्र.२ बहिण आहे व इतर प्रतिवादी सावत्र आई,बहिण, भाऊ आहेत. प्रतिवादींनी वादीसोबत असलेले नातेसंबंध नाकारले आहेत. परंतु प्रतिवादी क्र.२ हिने वादीसोबत असलेले नातेसंबंध मान्य केले आहेत. माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी नि.६५ वर वाद मुद्दे निश्चित केलेले आहेत. तसेच दि.०१.१२.२०१४ रोजी माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी वादीने वाद कथनामध्ये प्रतिवादीसोबत नमूद केलेले नातेसंबंध सिध्द

केले काय ? असा वाद मुद्दा निश्चित केला आहे. प्रतिवादींनी सदर अर्जामध्येसुध्दा नातेसंबंधी नवीन दोन अतिरीक्त मुद्दे काढण्याची विनंती केली. परंतु यापूर्वीच न्यायालयाने वादीच्या वाद कथनाप्रमाणे प्रतिवादीसोबत असलेल्या नातेसंबंधाबाबत अतिरीक्त मुद्दा निश्चित केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादींनी सदर अर्जामध्ये नमूद केलेले अतिरीक्त मुद्दे निश्चित करण्याची कोणतीही आवश्यकता नाही.

०४. मा.मुंबई उच्च न्यायालय,औरंगाबाद खंडपीठ यांनी रिट पीटीशन क्र.१७११/२०२४ मध्ये दि.०१.०७.२०२५ रोजीच्या आदेशा अन्वये सदरचा दावा हा दि.३०.०६.२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी निकाली काढण्याचे निर्देश दिले आहेत. त्याअनुषंगाने दि.०६.०८.२०२५ रोजी मा. उच्च न्यायालयाच्या रिटची पुर्तता करण्यात आली होती. सदरच्या आदेशामध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.३१.०७.२०२५ रोजी किंवा त्यापूर्वी प्रतिवादींनी रु.५०००/– खर्च वादींना दिल्यास दि.०६.०९.२०२३ रोजीचा आदेश रद्द करण्याचे निर्देश दिले होते. परंतु प्रतिवादीने दि.२५.०७.२०२५ रोजी सदरचा खर्च हा नि.१९२ अन्वये भरला आहे. प्रतिवादींनी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये खर्च भरण्यासाठी विलंब केला आहे. मा. उच्च न्यायालयाने दि.०६.०९.२०२३ रोजीचा आदेश रद्द केला आहे. त्यामुळे सदरचा दावा हा प्रतिवादी क्र.५ यांनी नि.१७५ वर पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे त्या अनुषंगाने वादीच्या उलटतपासासाठी प्रलंबित आहे.

०५. सदरचे प्रकरण हे प्रतिवादी क्र.५ चा उलटतपास वादीने घेण्यासाठी प्रलंबित असताना व मा. मुंबई उच्च न्यायालयाने सदरचे प्रकरण हे दि.३०.०६.२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी निकाली काढण्याचे निर्देश दिलेले असतानासुध्दा प्रतिवादींनी नि.१९४ वर त्यांच्या कैफियतीमध्ये दुरुस्ती करण्यासाठी अर्ज दाखल केला होता. सदरचा अर्ज हा न्यायालयाने दि.१२.०९.२०२५ रोजीच्या आदेशान्वये नामंजूर केला आहे. त्यानंतर दि.१९.०९.२०२५ रोजी प्रतिवादी व त्यांचे विद्वान वकील गैरहजर असल्यामुळे न्यायालयाने नि.१ वर आदेश पारीत करुन मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे सदरचे प्रकरण लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी सहकार्य करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर दि.२९.०९.२०२५ रोजी प्रतिवादींनी सदरचा अर्ज हा

दाखल केलेला आहे. तसेच प्रतिवादींनी नि.१९६ वर न्यायालयाने नि.१९४ वर पारीत केलेल्या आदेशाविरुध्द मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे अपील दाखल केल्यामुळे त्याचे कागदपत्र दाखल करण्यासाठी मुदत देण्याची विनंती केली होती. परंतु आजरोजी प्रतिवादींनी त्याबाबतचा कोणताही दस्त न्यायालयात दाखल केलेला नाही किंवा मा. उच्च न्यायालयाने सदर प्रकरणाध्ये स्थगीती दिल्याचा आदेश दाखल केला नाही.

०६. न्यायालयाने यापूर्वीच वादीने वादीच्या वाद कथनाप्रमाणे वादी व प्रतिवादी यांच्यातील नातेसंबंध सिध्द केले काय असा वाद मुद्दा प्रस्थापित केलेला असतानासुध्दा वादी व प्रतिवादी यांच्यातील व गंगुबाई यांच्यातील नातेसंबंधाविषयी अतिरीक्त मुद्दा काढण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला होता. मा. उच्च न्यायालयाने सदरचा दावा लवकरात लवकर निकाली काढण्याचे निर्देश दिलेले असतानासुध्दा प्रतिवादी यांना यापूर्वीसुध्दा दाव्यामध्ये पुरेशी संधी देऊनसुध्दा व सदरचा दावा प्रतिवादींच्या पुराव्यासाठी प्रलंबित असताना दुरुस्तीचा व अतिरीक्त मुद्दयाचा अर्ज दाखल करीत आहेत. त्यामुळे प्रतिवादींच्या वर नमूद केलेल्या वर्तनावरुन प्रतिवादी हे सदर दाव्याचे कामकाज लांबणीवर टाकत असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रतिवादीने दाखल केलेल्या मा. उच्च न्यायालयाच्या न्यायनिवाडयांचा आधार व त्यामध्ये नोंदविलेल्या निष्कर्षाचा आधार प्रतिवादींना घेता येणार नाही. त्यामुळे सदरचा अर्ज हा खर्चासह नामंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**-: आदेश :-**

१. निशाणी१९७ वरील अर्ज नामंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादींनी सदर अर्जाचा खर्च रक्कम रु.१०००/- पुढील तारखेला वादीला दयावा.

३. प्रतिवादी क्र.५ हे न्यायालयासमक्ष उलटतपासासाठी पुढील तारखेला हजर रहावेत.

Digitally signed by DNYANESHWAR MADHUKAR GITTE
Date: 2025.10.04 17:12:55 +0530

ठिकाण :- रेणापुर (ज्ञा.म.गित्ते)

दिनांक :- ०४/१०/२०२५ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, रेणापुर